## माननीय श्री. सोमनाथ सिताराम धुमाळ तथा दादासाहेब धुमाळ

यांना त्यांचे अमृत महोत्सवानिमित्त

# अखिल भारतीय सो. क्ष. कासार समाजातर्फे

सो. क्ष. कासार समाज
अधिवेशन १३ वे

# मानपत्र

पंढरपूर
दि. १९ ऑगस्ट १९८१

माननीय दादासाहेब, आपले जीवन हेच एक जणू चालते बोलते तत्वज्ञान आहे. अष्टपैलु हिऱ्याप्रमाणें सर्व समावेशक आहे. गेल्या ४० वर्षापासून या ना त्या कार्याद्वारे आपण राष्ट्र व समाज सेवा करित आहांत. मग या कार्यात राजकिय कार्य, शिक्षण संस्था सुरु करणेसारखे कार्य व्यायाम शाळेची मुहुर्तमेढ यासारखे अनेक कार्य अंतर्भूत आहेत. हे झाले समष्टी जीवनाबाबत तर वैयक्तीक जीवनातदेखील तीच जाणीव आपल्या जवळ आहे असे दिसून येते. आपल्या कौटुंबिक जीवनाकडे बघीतले म्हणजे याचे गमक एकच व ते म्हणजे निरलस सेवाभाव जो फारच थोडयांकडे आढळतो आपण आपल्या नियोजित कार्याचा गाजावाजा कधीच केला नाही. पण 'यशस्वीता' देखील गमावली नाही. याचे कारण एकच कार्याच्या बांधणीतील निटनेटकेपणा साधेपणा व पावित्र्य राखण्याची कुशलता. आणि याच गुणामुळे आपण सर्वत्र एक सौजन्यशाली प्रभावी कार्यकर्ता हा नावलौकीक संपादन केला. व ही बाब आंम्हास समाज या नात्यानेदेखील अभिमानास्पद अशी आहे.

समाज धारणा सुदृढ व्हावी, ज्या घटकांचा समाज बनतो तो घटक हाच मुळी मनाने व कृतीने विकसीत व्हावा यासाठी नित्य प्रयत्नरत रहावे ही आपली धारणा व हे कार्य नित्य नैमित्तिकता शुद्ध धर्माचरण यामुळे होते ही आपल्या मनः स्वभावाची ठेवण आणि म्हणूनच गंगौघाप्रमाणें नि सातत्याने जिवनकार्यात जगावे हा आपला सर्वांना संदेश असतो.

याच दृष्टीने विचार केला म्हणजे मग लक्षात येते कीं, समाज संस्था, कार्यकर्ते व कार्यस्वरुप या अर्थाने बदलले तरी आपले त्या प्रत्येकाशी नाते तेच सामंजस्याचे, आपुलकीचे, स्नेहाचे पहिल्याप्रमाणें दुसऱ्याच्या विचाराशी ती तशीच समरसता यातच आपल्या 'दिल जमाईचे' व 'अजात शत्रुत्वाचे' रहस्य आहे. याची पावती म्हणून की काय नाशिक जिल्ह्यात आपला सत्कार झाला तो मुळी एक समृद्ध, कृतिपूर्ण, कृतार्थ, सुखी संपन्न, समाधानी जीवनाचा सत्कार या अर्थाने हे झाले आपले सामाजिक कार्य.

माननीय श्रीमान दादासाहेब आपण 'विद्वत्ता' शालीनता व नम्रता यांचा त्रिवेणी संगमच आहांत यादृष्टीने आपल्या जीवनाकडे बघताना लक्षात येते का, आपण विद्यार्थी दशेतदेखील अनेक शिष्यवृत्त्या मिळविल्यात तर्कशास्त्र व तत्वज्ञान याची सांगड घालून डेक्कन कॉलेज मध्ये काही दिवस प्राध्यापकाची नोकरी देखील केली, पण याचवेळी वडीलांनी घरचा पारंपारीक व्यवसाय करणेस परत बोलविता क्षणीच आपण प्राध्यापक पदाचा राजीनामा देऊन परत आलात यातून व आपल्या विनम्रतेची साक्ष पटते.

आपण काही कालावधी नंतर वकिली व्यवसाय सुरु केला व त्यातही 'प्रसिद्ध कायदे पंडीत' प्रथितयश विधीज्ञ म्हणून नांव लौकीक मिळविला. तो या सरस्वती पुत्राकडे लक्ष्मी नांदू लागली याबाबत आपले एकच म्हणणे की, "कर्तृत्व" हेच माणसाला श्रेष्ठत्व मिळवून देते.

आपणास लक्ष्मी व सरस्वतीची पूर्ण कृपा लाभलेली असूनही आपणाकडे गुण ग्राहकता, समाज सेवेची दृष्टी व समाज सुख दुःखाची जाणीव हे देखिल आहेंच.

आपणास जसा ऐहीक जगाच्या ज्ञानाचा ध्यास आहे व त्यातून जशी यशस्वीता लाभलेली आहे. तशीच आंतरीक तळमळ, परमेश्वरी शक्ति विषयी आहे. यासाठी आपण तौलनीक दृष्टचा गीता पुराणे, अुपनिषदे, संत वाङ्मय, कुराण बायबल, यांचाही सखोल अभ्यास आपण केलेला आहे. तसेच गायत्री, पुरश्चरण, गायत्रीयज्ञादी करुन समाजास सुयोग्य धार्मीक व अध्यात्मीक मार्गदर्शन देखील करतात.

आपणास एकूणतः या आपल्या सर्वांग सुंदर जीवन व्यवसायांस मोठमोठ्या व्यक्तिचे, संत विभूतीचे मार्गदर्शन लाभले आहे, लाभत आहे.

'जो दुसऱ्यासाठी जगतो तेच खरे जीवन' यानुसार आपण, समाज, गांव, देशासाठी सेवा करीत अहात. 'जीवेत् शरदः शतम्' आपल्या या सामाजिक, धार्मीक कार्यात आपल्या सहधर्मचारिणी सौ. शांताबाईचाही फार मोठा वाटा आहे. अुभयतांस परमेश्वर दिर्घ आयुः आरोग्य देवो व आम्हां सर्वांना आपली शताब्दी साजरी करण्याची सुवर्ण [illegible]धी देवो अशी ह्या अमृत महोत्सवी इश्वर चरणी सविनय प्रार्थना.

पंढरपूर : १९।८।१९८१ ॥ जीवेत् शरदः शतम् ॥

( कमल प्रिंटर्स, पंढरपूर )